**Limca**
Book of Records
*National Records*
Edu. on Wheels, an initiative of
Sachin V. Joshi Caters to educational
Needs of slum Children.

*Editor, Limca book of Records*

# सचिन उषा विलास जोशी

शिक्षण अभ्यासक

ज्ञानाचा प्रकाश
झोपड्यांत नेशी
धन्य धन्य होशी
सचिन तू. मंगेश पाडगांवकर
7.5.2008

शिक्षणक्षेत्रात मुलभूत बदल करण्याच्या हेतूने सचिन जोशी यांनी शिक्षणक्षेत्रात काम करण्यात सुरुवात केली. शाळेत असतांना नेहमी Unit Test मधे नापास होणारे सचिन सर यांनी पुणे विद्यापीठाच्या विविध विषयात पोस्ट ग्रॅज्युएशन करुन ७ विविध डिग्रीज घेतल्या आहेत पण एकही दिवस जॉब न करता त्यांनी सर्व प्रथम पुणे येथे **'नापासांची शाळा'** काढली.

अतिशय कमी वयात त्यांनी नवनवीन संकल्पना शिक्षण क्षेत्रात रुजविल्या. जिथे शिक्षण पोहचू शकत नाही तिथे शिक्षण पोहचविण्यासाठी त्यांनी समाजकार्याच्या माध्यमातून त्यांनी भारतातील पहिली 'फिरती शाळा' बनविली.

'चाकं शिक्षणाची' या सामाजिक संस्थेचे ते संस्थापक, संचालक असून झोपडपट्टीमधील विद्यार्थ्यांसाठी फिरत्या शाळेच्या माध्यमातून 'Support Class" चालवतात. या फिरत्या शाळेला लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड ह्या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

त्यांनी **'शाळाबाह्य'** मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी **'Every Child Count' Campaign** सुरु केले आहे. आतापर्यंत ५५०० हून अधिक मुलांना त्यांनी शाळा मिळवून दिली असून **झोपडपट्टीमधील ३०० विदयार्थीनीना त्यांनी शैक्षणिक दत्तक घेतले आहे.**

ते शासनाच्या विविध शैक्षणिक समितीवर सुध्दा कार्यरत आहेत.
ते शैक्षणिक विषयांवर कार्यशाळा, व्याख्यान व परिसंवाद घेत असतात.
सचिन जोशी यांनी लिहीलीली विविध पुस्तके प्रकाशीत झाली आहेत.
तसेच बालमानसशास्त्र आधारीत शाळांवर ते कामे करतात.

त्यांनी गांधी–आईनस्टाईन यांच्या शिक्षणतत्वांवर आधारीत 'इस्पॅलियर–एक्सप्रिमेंटल स्कूल' या प्रयोगशील शाळेची स्थापना केली आहे.

या शाळेला 'Most Innovative School ' या पुरस्काराने सन्मानीत केला आहे. तसेच **या प्रयोगशील शाळेला जागतिक स्तरावरील ''डिझाईन फॉर चेंज'' या संस्थेकडून ''I CAN AWARD'' सुध्दा मिळाला आहे.**

**तसेच शिक्षणक्षेत्रात विविध संशोधन करण्यासाठी इस्पॅलियर – हेरीटेज स्कूल या शाळेची त्यांनी स्थापना केली असून अनुभवातुन शिक्षण या तत्वावर ही शाळा चालते.**

या सर्व कार्याची दखल घेवून सचिन जोशी यांना विविध मान्यवरांकडून आशीर्वाद, प्रोत्साहन व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यामध्ये माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, कवी मंगेश पाडगांवकर, प्राचार्य स्व. शिवाजीराव भोसले, पर्यावरणवादी सुंदरलाल बहुगुणा, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आण्णा हजारे, भारतीय मानसशास्त्राचे अभ्यासक भिष्मराज बाम, साहित्यिक आणि राजकारणी श्री. शशी थरुर, जागतिक विचारवंत श्री. संदीप वासलेकर, अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे संस्थापक शाम मानव यांनी **'सचिन उषा विलास जोशी'** यांच्या कार्याला गौरविले आहे.

त्यांचे वैशिष्टे म्हणजे ते त्यांच्या नावात आईचे नाव सुध्दा लावतात आणि हा बदल त्यांच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी केला असून त्यांच्या शाळेत प्रत्येक विद्यार्थी असेच नाव लावतात.

युरोपीयन कॉन्सिल आणि युरोपीयन पार्लेमेंट आयोजीत, **'वर्ल्ड फोरम फॉर डेमॉक्रॉसी'** या जागतिक लोकशाही परीसंवादासाठी शिक्षण अभ्यासक, सचिन उषा विलास जोशी यांना व्याख्यानासाठी बोलवण्यात आले होते. युरोपीयन पार्लेमेंटमध्ये शिक्षण या विषयांवर व्याख्यान देण्यारे ते पहिले भारतीय आहेत.

जागतिक स्तरावर काम करत असलेली **डिझाईन फॉर चेंज** या संस्थेने शिक्षण क्षेत्रातील अभिनव कल्पना राबविण्याबद्दल **'एज्युकेशन हिरो अवार्ड'** सचिन उषा विलास जोशी यांना देण्यात आला. **नाशिक महानगरपालिकेचा 'शिक्षक गुणवंत पुरस्कार'** सुध्दा त्यांना प्रदान करण्यात आला. रोटरी क्लबचा व्होकेशनल अवार्ड, देशदूत वृत्तसंस्थेचा तेजस पुरस्कार, शिक्षण तज्ञ ग्लोरीआ डिसूजा यांचा **Best School Educator Award** अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानीत केले आहे.

जागतिक स्तरावरील शिक्षणक्षेत्राचे २५१ उत्तम शिक्षणतज्ञ यांच्या यादीमध्ये सचिन उषा विलास जोशी यांना शामिल करण्यात आले आणि त्यांना **'२५१ ग्लोबल लिडर अवॉर्ड'** ने सन्मानित करण्यात आले.